# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक १२.०५.२०२६

**विश्वजित संजय भामरे, तांत्रिक सहायक, पंचायत समिती, धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे ७,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| ला. प्र. विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र. | देवपुर पो.स्टे. गुरनं.        /२०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दि | भ्र.प्र. कायदा कलम ७ व ७–अ प्रमाणे, दि.१२.०५.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | विश्वजित संजय भामरे, वय ३१ वर्षे, तांत्रिक सहायक, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पंचायत समिती, धुळे, रा. प्लॉट नं. ०१, भरत नगर, नकाणे रोड, धुळे, मो. नं. ७०२०६७४५३७ |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत :–</u>** यातील तक्रारदार यांच्या भाउ'व वहिणीच्या नांवे मौजे नंदाळे बु. येथे शेतजमीन असुन सदरची शेतजमीन तक्रारदार हे कसतात. सदर शेतजमीनीमध्ये तक्रारदार यांच्या वहिणीस महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२३ – २४ मध्ये विहिर खोदण्यासाठी ३,९९,६१०/– रुपये मंजुर झाले आहेत. सदर मंजुर झालेल्या विहीरीच्या अनुदानापैकी २,३९,०००/– रुपये तक्रारदार यांच्या वहिणीस अदा करण्यात आले आहे. सदर विहीरीचे काम पुर्ण झाल्याने झालेल्या कामाच्या उर्वरीत अनुदानाची रक्कम मिळण्याकरीता तक्रारदार हे पाठपुरावा करीत होते. तक्रारदार यांनी दि.०५.०५.२०२६ रोजी पंचायत समिती, धुळे कार्यालयात जावुन उर्वरीत अनुदानाच्या रकमेबाबत तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना विहिरीची मोजमाप पुस्तिका तपासणी करीता पुढे पाठविण्यासाठी शाखा अभियंता व उप अभियंता यांचेकरीता ७,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन आज दि.१२.०५.२०२६ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची आज रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत: करीता तसेच वरिष्ठांकरीता ७,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांनी तक्रारदार यांचेकडुन ७,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आल्याने गुन्हा

| | |
|---|---|
| **पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **तपास अधिकारी** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा पथक** | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, सागर माळी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"</u>**


**संपर्क पत्ता** :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :– acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :– dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :– १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :– ०२५६२–२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :– ७७९९८१६१०६४